## निशाणी क्र. ५ खालील आदेश

अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होत असुन त्यांची उत्तरे मी खालील प्रमाणे दिलेली आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्यांच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस शाबित करतात काय ? | **नकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल आपल्या बाजुने असल्याचे वादी शाबीत करतात काय ? | **नकारार्थी** |
| ३. | तुर्तातुर्त मनाई न दिल्यास आपले अपरिमित हानी होणार असल्याचे वादी शाबीत करतात काय ? | **नकारार्थी** |
| ४. | हुकुम काय ? | **अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ३ करीता :–**

**वादी यांचा युकतीवाद –**

०३. वादी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई, नागपुर खंडपिठ **यांचे रिट पिटीशन क्र. ५७६५/२०१०, कृष्णा चौधरी विरुध्द ॲडिशनल कनिश्नर नागपूर डिव्हीजन, नागपूर, निकाल तारीख १२/१०/२०११, रिट पिटीशन क्र. १६६२/२०२५, गंगाधार गव्हाले विरुध्द महाराष्ट्र सरकार, निकाल तारीख**

**०४/११/२०२५** व **गणेश भागवत विरुध्द विजय बंडे, रिट पिटीशन क्र. ३६४४/२०१४, निकाल तारीख २८/११/२०१४** या न्यायनिवाडयाचा आधार घेतला आहे. वादी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये त्यांना तहसिलदार यांचेकडील मुळ प्रकरणाचे कोणतीही नोटीस दिली नसल्यामुळे त्यांना मुळ प्रकरणामध्ये म्हणणे मांडण्याची संधी मिळाली नाही. त्यामुळे, त्यांच्या अपरोक्ष झालेला सदर तहसिलदार यांचा दि. १८/११/२०२५ रोजीचा आदेश त्यांचेवर बंधनकारक नसल्याचे व तो रद्दबातल होण्यास पात्र असल्याचे त्यांनी सांगीतले.

०४. प्रतिवादी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये तहलिसदार यांनी कायदेशिर प्रक्रियेचा अवलंब करुन निकाल दिल्याचे सांगीतले आहे. त्यांनी तहसिलदार यांच्याकडील सदर प्रकरणातील पर्यायी रस्ता नसल्याचे निष्कर्ष देवूनच सदर रस्ता मंजूर केल्यामुळे तो महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १४३ तरतुदनीसार योग्य आदेश असल्याचे त्यांनी सांगीतले आहे. त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये मा.सर्वोच्च न्यायालय यांचे **सिव्हील अपिल क्र. ४३२/१९६३, एन.के. मोहम्मद सुलेमानसाहीब विरुध्द एन.सी.मोहम्मद इस्माईल साहेब व इतर, दि.२३/०९/१९६५** या न्यायनिवाडयाचा आधार घेवून असे सांगीतले की, ज्या वेळी एखादी व्यक्ती त्यांचे म्हणणे ऐकून न घेता निकाल झाल्याचे तक्रार करतो त्यावेळी, त्यांची नेमकी काय हरकत आहे व त्या हरकतीचे विचार करुन न्यायनिर्णयावर काही फरक पडतो का? हे पाहणे आवश्यक असल्याचे सांगीतले आहे. ज्यावेळी एखादया समूहाच्या बाबतीतील सामाईक निर्णयाबाबत विचार करताना प्रातिनिधीक स्वरुपात जर समुहाच्यावतीने एकाने जरी सर्व मुद्दे मांडले असतील तरी प्रत्येकाचे म्हणणे न ऐकल्याचा मुद्दा हा एखादा निर्णय रद्द

करण्यासाठी पुरेसा नाही. त्यांनी त्यांचे युक्तीवादाची भिस्त मा.कर्नाटक उच्च न्यायालय यांचे **के.एस.व्यंकटेश विरुध्द एन.जी.लक्ष्मीनारायण व इतर, आर.एस.ए. क्र.४९१/२००७, निकाल दि.०४/०४/२००७** या न्यायनिवाडयाचा आधार व वादी यांनी प्रस्तुतचा तहसिलदार यांचा आदेश कशाप्रकारे अवैध ठरतो यांचे विवेचन दाव्यामध्ये केले नसल्यामुळे केवळ तो त्या प्रक्रियेमध्ये पक्षकार नव्हता या मुद्दयाच्या आधारे संपुर्ण आदेश रद्द ठरविणे योग्य होणार नाही असा युक्तीवाद सांगीतला. वादी यांनी त्यांचे दाव्यामध्ये कोठेही प्रतिवादी यांना कशाप्रकारे रस्ता उपलब्ध आहे हे स्पष्ट केले नाही. या परिस्थितीत, वादीची हरकत ग्राहय धरता येणार नाही.

०५. या प्रकरणी अभिलेखाचे अवलोकन केले असता दोन्ही बाजूनी दाखल केलेले न्यायनिवाडे पाहता या प्रकरणी ही बाब वादामध्ये नाही की, वादी हे मुळ प्रकरणामध्ये पक्षकार नव्हते. त्यामुळे, निश्चीतच वादी यांना त्यांची बाजू मांडण्याचा अधिकार मिळालेला नाही. कलम १४३(४) चे तरतुदीनुसार प्रस्तुत वादी यांनी सदरचा दावा दाखल केला आहे. वादी हे मुळ प्रकरणामध्ये पक्षकार नसल्यामुळे सदर आदेश त्यांना संधी न देता पारित झाल्याचा मुद्दयावरुन त्यांनी तहसिलदार यांच्याकडे कोणताही अर्ज केलेला नाही. त्यांनी दिवाणी दावा दाखल करुन महसूल अधिकारी यांचेकडे दाद मागण्याकरीता असलेली संधी सोडून दिलेली आहे. त्यामुळे, सदर प्रकरणी निर्माण झालेली परिस्थिती ही गणेश भागवत (वरीलप्रमाणे) मधील खटल्याप्रमाणे झालेली आहे. सदर न्यायनिवाडयामध्ये मा.उच्च न्यायालय यांनी त्या प्रकरणातील वादी यांना तहसिलदार यांचेकडे बाजू मांडण्याची संधी देताना वादी हे दावा काढून घेत असल्याबाबत त्यांचेकडून हमी घेतल्याचे दिसून येते. या परिस्थितीमध्ये, प्रस्तुत प्रकरणी

युक्तीवादादरम्यान वादी यांनी तशी तयारी असल्याबाबत कोणतेही हमीपत्र दिलेले नाही. त्यामुळे, सदरचा दावा व अर्ज हा गुणदोषावरच पाहणे योग्य होणार आहे.

०६. या प्रकरणी वादी यांना मुळ प्रकरणामध्ये पक्षकार न केल्यामुळे त्यांचे हितास बाधक आदेश झाला आहे का तसेच तसा आदेश हा वादीने प्रस्तुत दाव्यात उपस्थित केलेल्या हरकतीमुळे प्रथमदर्शनी अवैध ठरतो का या निकषावर तहसिलदार यांचा आदेश तपासणे आवश्यक आहे.

०७. वादी यांनी दाव्यात घेतलेल्या हरकतीनुसार प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना जाणे–येणेकरीता सोयीचा रस्ता उपलब्ध असल्याचे म्हटले आहे. तथापी, त्यांच्या दाव्यामध्ये सदर सोयीचा रस्ता कोणता आहे, याचा उल्लेख केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे, सदर बाबीचा विचार करता वादी यांची हरकत मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तहसिलदार यांचे दोनही पंचनाम्यामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना कोणता रस्ता उपलब्ध आहे हे दिसून येत नाही. तहसिलदार यांचे आदेशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्यांनी दि.१०/०६/२०२५ रोजीच्या स्थळपाहणी अहवालाचा उल्लेख केलेला आहे. सदर स्थळपाहणी अहवालामधील निरीक्षणाच्याद्वारे त्यांना त्या प्रकरणातील अर्जदार म्हणजेच प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याचे निष्कर्ष देवून कलम १४३ चे तरतुदीचा वापर करुन गट क्र. ८१३/१ चे पुर्व बांधाकडे, गट क्र. ७४३/१ व गट क्र. ८१६ व गट क्र. ८१७/३/अ च्या दरम्यान असलेल्या बांधावरुन नविन रस्ता मंजूर केला आहे. या परिस्थितीत, कलम १४३ चे तरतुदीनुसार त्यांचे आदेशामध्ये पर्यायी रस्ता उपलब्ध नसणे व दिलेला रस्ता

बांधावरुन देणे या मुलभूत बाबींचे पालन केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी गट क्र. ८१७ चे धारकांनी गट क्र. ८१७ मधील सर्व धारकांकरीता रस्ता उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. सदर प्रकरणी भुमी अभिलेख कार्यालयातील नकाशाचे अवलोकन केले असता सदर संपुर्ण गट क्र. ८१७ हा रस्त्यालगत आहे. तथापी, त्यामध्ये कोणते पोट-हिस्से पडले, त्यापैकी प्रतिवादी यांना रस्ता देण्याची जबाबदारी कोणाची होती, सदर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना इजमेंट बाय नेसेसीटी तत्वानुसार किंवा त्यांचे खरेदीखतामध्ये नमूद केल्यानुसार रस्ता कोणता आहे या सर्व बाबी मुळ प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान पाहता येतील. खरेदीखतामध्ये नमूद रस्ता हा प्रतिवादी यांचे गटास/क्षेत्रास कशाप्रकारे सद्यस्थितीत उपलब्ध आहे याचे विवेचन वादी यांनी केलेले नाही. त्यामुळे, केवळ खरेदीखतामधील रस्त्याच्या उल्लेखाच्या आधारे प्रत्यक्ष स्थळपाहणीवेळी तो रस्ता दाखवला नसताना प्रकरणाच्या या टप्यावर सखोल स्वरुपाचाी चौकशी करता येणार नाही. या सर्व परिस्थितीमुळे कृष्णा चौधरी (वरीलप्रमाणे) मधील न्यायनिर्णयाचा लाभ वादीस मिळणार नाही. त्याचबरोबर, वादीचा नैसर्गिक न्यायतत्वानुसार हक्क कशाप्रकारे बाधीत होतो हे पाहताना सदरचा आदेश हा अवैध ठरविण्याकरीता असा कोणता मुद्दा मागे राहीला होता की ज्यामुळे वादीच्या न्यायहक्कास बाधा आली याचे स्पष्टीकरण दाव्यामध्ये नसल्याने तसेच सदर प्रकरणी प्रातिनिधीक स्वरुपात आलेल्या हरकती मांडल्या गेल्या असल्याने गंगाधार गव्हाळे (वरीलप्रमाणे) खटलयाचा लाभ वादीस मिळणार नाही. तथापी, सदर बाबी या महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४३ चे तरतुदीनुसार शेतीचे नुकसान होवू नये या अनुषंगाने विचार करण्याकरीता आवश्यक नसल्याने त्याबाबीमुळे प्रथमदर्शनी तहसिलदार यांचा आदेश हा अवैध किंवा कायदेशिर नाही असे म्हणता येणार नाही.

त्यामुळे, वादी यांचे लाभात प्रथम दर्शनी केस आहे असे म्हणता येणार नाही.

०८. प्रतिवादी यांचे लाभात दिलेला रस्ता हा त्यांची गरज पाहून दिल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्यामुळे दाव्याची सुनावणी अद्याप प्रलंबित असताना दाव्याचे समतोलत्व प्रतिवादी यांचे लाभात आहे असे म्हणावे लागेल.

०९. प्रस्तुत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४३ चे तरतुदीनुसार दिलेला रस्ता हा तातडीचा व या न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून असल्याने सदर रस्त्याचा आदेश हा वरनमूद चर्चेमध्ये दिलेल्या निकषाच्या आधारे मुळ सुनावणीवेळी तपासला जाणार आहे. या परिस्थितीत, मुळ रस्त्याचा ऊहापोह होईपर्यंत प्रतिवादीयांना रस्त्याचा हक्क नाकारल्यास त्यांची शेतीचे व शेतमालाचे नुकसान होणार आहे. या परिस्थितीत, वादी यांचे बाबतीत पाहील्यास प्रतिवादींचे नुकसान वादीचे तुलनेत अधिक होणार आहे. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ यांचे उत्तर मी नकारार्थी देतो.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u> :–**

१०. मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी दिल्याने वादी मनाईची दाद मिळण्यास पात्र नाही. सबब, आदेश.

## <u>आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

LAMBE PRATIK GANESH
Digitally signed by LAMBE PRATIK GANESH
Date: 2026.03.17 10:58:56 +0530

**( प्रतिक गणेश लंबे )**

दिनांक: १६/०३/२०२६. सह दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, माढा.